महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

===============================================================

जावक क्रमांक – ३९९६/५४ दिनांक :- ०८ ऑक्टोबर, २०२४

**प्रसिद्धिपत्रक**

# समूह पुनर्विकास प्रकल्पांच्या माध्यमातून सर्वसामान्यांना मुंबईत उपलब्ध होणार घरे - गृहनिर्माण मंत्री श्री. अतुल सावे

म्हाडा मुंबई मंडळातर्फे २०३० सदनिकांच्या विक्रीसाठी संगणकीय सोडत उत्साहात

मुंबई, दि. ८ ऑक्टोबर, २०२४ :- म्हाडाच्या मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या २०३० सदनिकांकरीता सुमारे एक लाख तेरा हजार अर्जदारांचा लाभलेला प्रतिसादावरून मुंबई शरातील परवडणाऱ्या दरातील घरांची वाढती मागणी अधोरेखित होते. मुंबईतील घरांच्या वाढत्या मागणीचा प्रश्न सोडविण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. मुंबईचे सीमित भौगोलिक क्षेत्र लक्षात घेता घरांच्या तुटवडयाचा प्रश्न पुनर्विकासाच्या माध्यमातून सोडविता यावा याद्दष्टीने राज्य शासनातर्फे पुनर्वसन नियमावली अधिकाधिक सुलभ करण्यावर भर दिला जात असल्याची माहिती गृहनिर्माण मंत्री श्री. अतुल सावे यांनी दिले.

समूह पुनर्विकासाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात गृहसाठा निर्माण होऊ शकतो त्याचबरोबर शहरातील पायाभूत सुविधांचे नियोजन देखील सुलभरित्या करता येणार आहे म्हणूनच त्यांत दाटीवाटीने वसलेल्या दक्षिण मुंबईतील कामाठीपुरा समूह पुनर्वसन प्रकल्पाचे नियोजन करण्यात येत आहे. त्याचबरोबर बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्प व काळाचौकी अभ्युदयनगर वसाहत, जोगेश्वरी येथील पीएमजी प्रकल्पातील इमारतींचा पुनर्विकास तसेच म्हाडा अभिन्यासातील जुन्या वसाहतींच्या पुनर्विकासातून मुंबई शहराला मोठ्या प्रमाणात अतिरिक्त गृहसाठा नजीकच्या भविष्यात निर्माण होणार आहे. याद्वारे सर्वसामान्यांसाठी मुंबईत हक्काची घरे उपलब्ध होणार असून सर्वसामान्यांच्या गृहस्वप्नपूर्तीसाठी महाराष्ट्र शासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन गृहनिर्माण मंत्री श्री. अतुल सावे यांनी आज केले.

नरिमन पॉइंट येथील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे मुंबई शहराचे पालकमंत्री श्री. दीपक केसरकर व गृहनिर्माण मंत्री श्री. अतुल सावे यांच्या हस्ते आज २०३० सदनिकांच्या विक्रीसाठी संगणकीय सोडत काढण्यात आली. याप्रसंगी श्री. सावे म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी प्रधान मंत्री आवास योजनेच्या माध्यमातून देशातील बेघर कुटुंबांना हक्काचा निवारा देण्याचा संकल्प सिद्धीस नेत आहेत. याच उद्दिष्टांवर शासन कार्यरत असून राज्याचे नवीन गृहनिर्माण धोरण सक्षम अधिकारी श्रीमती वल्सा नायर-सिंह यांच्या सक्षम नेतृत्वाखाली आकार घेत आहे. या गृहनिर्माण धोरणामध्ये परवडणाऱ्या व टिकाऊ घरांच्या उभारणीवर भर दिला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ते पुढे म्हणाले की, मुंबईसारख्या शहरामध्ये हक्काचे घर असावे असे प्रत्येकाचे स्वप्न असते आणि म्हाडाच्या माध्यमातून आजवर सुमारे नऊ लाख कुटुंबियांना हक्काचा निवारा प्राप्त झाला आहे. यापैकी सुमारे दोन लाख पंचवीस हजार घरे ही केवळ मुंबई शहरात उभारण्यात आली आहेत. अशा प्रकारे राज्यातील प्रत्येक बेघर कुटुंबाला हक्काचा निवारा मिळवून

देण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. मुंबईकरांचे स्वतःचे घराचे स्वप्न म्हाडाच्या माध्यमातून साकार होत आहे याचा मला आनंद असल्याचे श्री. सावे यांनी सांगितले.

म्हाडाच्या या सोडतीमुळे मुंबईत सर्वसामान्य नागरिकांना घर मिळणार आहे. म्हाडाने मुंबईतील सर्वसामान्य जनतेला दिलासा देण्याचे काम केले असल्याचे मुंबई शहराचे पालकमंत्री दीपक केसरकर यांनी सांगितले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली मुंबईचा सर्वांगीण विकास करण्यात येत आहे. मुंबई सुंदर बनत आहे. धारावी, बीडीडी चाळ यांच्या पुनर्विकासामुळे या भागातील नागरिकांच्या हक्काच्या घरांचे स्वप्न पूर्ण होणार असल्याचे श्री. केसरकर यांनी सांगितले.

याप्रसंगी गृहनिर्माण विभागाच्या अपर मुख्य सचिव वल्सा नायर- सिंह यांनी म्हाडाच्या नूतन संगणकीय सोडत प्रणालीचे कौतुक करताना सांगितले की, संगणकीय सोडत प्रणाली पूर्णपणे मानवी हस्तक्षेपविरहित करणे हे मोठे आव्हान आहे मात्र हे म्हाडाने शक्य केले आहे. या पारदर्शक सोडतीवर नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन आपली पसंती आणि विश्वास नोंदविला आहे. म्हाडाच्या सोडतीतील निर्णयावर आजवर नागरिकांनी देखील सहमती दर्शविली आहे म्हणूनच म्हाडा आणि विश्वास हे समीकरण सक्षमतेने मांडले जात आहे, असे त्या म्हणाल्या. तत्पूर्वी प्रास्ताविकामध्ये श्री. जयस्वाल यांनी २०३० सदनिकांकरिता नागरिकांनी दिलेल्या प्रतिसदाबद्दल आभार मानले. त्यांनी सांगितले की, म्हाडाच्या सोडतीला मिळणारा प्रतिसाद म्हणजे नागरिकांचा म्हाडावरील विश्वास दर्शवितो. नागरिकांच्या निवाऱ्याचा प्रश्न सोडविण्याकरिता मुंबई मंडळातर्फे पुढील सोडत मार्च २०२५ मध्ये जाहीर करण्यात येईल. तसेच येत्या आठवड्यात म्हाडाचा विभागीय घटक कोंकण मंडळातर्फे सदनिका विक्रीकरिता सोडत जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती दिली. विद्यमान सोडतीत अनामत रकमेसह १ लाख १३ हजार ८११ अर्ज पात्र झाले. लोकांच्या मागणीनुसार या सोडतीतील सदनिकांचे दरही कमी करण्यात आले. त्यामुळे या सोडतीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. म्हाडाच्या विभागीय मंडळांनी गेल्या दोन वर्षांच्या कालावधीत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांत सुमारे २७,००० परवडणारी घरे तसेच भूखंड सोडतीद्वारे नागरिकांना उपलब्ध करून दिले असल्याचे श्री. जयस्वाल यांनी सांगितले.

याप्रसंगी सोडतीतील विजेत्या ठरलेल्या अर्जदारांना मान्यवरांच्या हस्ते अभिनंदन पत्र यावेळी देण्यात आले. आभार श्री. मिलिंद बोरीकर यांनी मानले.

--

सोडतीत सहभाग घेतलेल्या अर्जदारांची संख्या लक्षात घेता मंडळातर्फे व्यापक नियोजन करण्यात आले होते. तसेच अर्जदारांना सोयीस्कररीत्या निकाल पाहता यावा याकरिता सभागृहाच्या आवारात व सभागृहात एलईडी स्क्रीन लावण्यात आले होते. म्हाडाच्या अधिकृत यूट्यूब चॅनल व फेसबूक पेजवरुन सोडतीचे थेट प्रक्षेपण करण्यात आले सदर प्रक्षेपण सुमारे ५५००० जणांनी बघितले. या प्रक्षेपणाला यूट्यूब चॅनल ९६४०० व्युस मिळाले आहेत.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा

---

**सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :**

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

===========================================================================

Outward No. 3996/54 Dt. 8th October, 2024

Press Release

# Affordable Homes in Mumbai Through Cluster Redevelopment :- Housing Minister Mr. Atul Save

MHADA's Mumbai Board Successfully Holds Lottery Draw for 2,030 Flats, Bringing Homes Closer to Reality for Thousands

Mumbai, October 8, 2024 – The dream of owning a home in Mumbai came closer to reality today as MHADA's Mumbai Housing and Area Development Board conducted a computerized lottery draw for 2,030 flats. With over 1.13 lakh applicants, the overwhelming response underscores the city's persistent demand for affordable housing. At the event, Housing Minister Shri. Atul Save affirmed the government's commitment to addressing this demand through accelerated redevelopment efforts.

"Every Mumbaikar dreams of having a home to call their own. Given the geographical limitations of Mumbai, where land is scarce, redevelopment has become the most viable solution to create new housing opportunities," said Mr. Save. He emphasized that the government is focused on simplifying rehabilitation policies to facilitate faster redevelopment, which will not only increase housing stock but also enhance the city's infrastructure. "Projects like the Kamathipura Cluster Redevelopment, BDD Chawl Redevelopment, and the redevelopment of MHADA layouts at Kalachowki, Abhyudaya Nagar, and Jogeshwari's PMG buildings will soon provide homes to many who have long awaited them," he added. These initiatives, he noted, reflect the state's commitment to ensuring that every common citizen has access to a home in Mumbai.

Mumbai City Guardian Minister Shri. Deepak Kesarkar also spoke at the event, expressing his satisfaction with MHADA's ongoing work to fulfill the housing needs of the city. "This lottery is not just about flats; it is about realizing the long-standing dreams of thousands. MHADA has been a beacon of hope for the common man, and with projects like Dharavi and BDD Chawl redevelopment, we will soon see many more dreams come true," he remarked.

Mrs. Valsa Nair-Singh, IAS, Additional Chief Secretary of the Housing Department, praised MHADA's computerized lottery system, emphasizing, "Eliminating human intervention in such a large-scale process was a major challenge, but MHADA has successfully achieved this. The transparency of the system has earned the trust of the public, and the positive response from citizens is heartening."

Mr. Sanjeev Jaiswal, IAS, Vice President and CEO of MHADA, expressed his gratitude for the overwhelming participation. "The immense trust people place in MHADA is evident from the response to this lottery. To meet the growing demand, we are already preparing for the next lottery, which will be held in March 2025. Moreover, the Konkan Board will soon announce its own lottery for flat sales in the coming week," he shared. He also noted that 1,13,811 applications were found eligible for today's lottery, and the prices of flats were reduced based on public demand, contributing to the enthusiastic turnout.

Among the winners of today's lottery was Jayashree Sanjay Hutkar, who applied for a flat under MHADA's Vikhroli scheme. Overjoyed at her win, she shared that for years, she had endured long commutes for work and dreamt of owning a home closer to her workplace. "Now, with my own home in Mumbai, I can finally save time and live comfortably. The entire application process for the lottery was incredibly simple, and the online system was so transparent that I faced no issues," she said, expressing her delight.

Pramod Dinkar Gaikwad, another winner, received a flat in the Vikhroli Kannamwar scheme through the Ex-Servicemen Quota. He had applied for a flat four years ago but was unsuccessful. "This time, I applied under the Economically Weaker Section (EWS) category

and was fortunate to secure a home. My family and I are extremely happy to finally have our own place in Mumbai," he said.

Nishant Kate, a MHADA employee since 2013, had been applying for a flat since the 2014 lotteries but was never successful—until today. "After so many years of waiting, it feels incredible to finally own a home in Mumbai. Earlier, when the entire process was offline, there were numerous challenges. Now, with everything online, the application process went smoothly. I am truly grateful to MHADA for making this possible," he said.

Sanjay Rajput, another successful applicant, shared a deeply personal story. "For the last 15 to 18 years, my family and I have been living in a chawl and applying for a home. My mother always wished for a bigger, better house. Today, before coming here, she blessed me, saying, 'Go, today your dream will come true.' I am thrilled to say that her blessing came true, and I now have a home through MHADA. Additionally, my brother, Vikram Rajput, was martyred in Pulwama, and I had applied for a flat in my sister-in-law's name. She too received a flat on her first attempt, which brings even more joy to our family. I will always be indebted to MHADA for this."

The event was live-streamed on MHADA's YouTube channel and Facebook page, with more than 55,000 viewers following the proceedings online. The YouTube live stream received 96,400 views, further showcasing the public's strong interest in the event.

###

(Vaishali Gadpale)

Chief Public Relations Officer, MHADA

---

**Follow us on :**

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial


म्हाडा
MHADA
सोडत म्हाडाची स्वप्नपूर्ती हक्काच्या घराची
मंगळवार, दि. ८ ऑक्टोबर २०२४
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
(म्हाडाचा विभागीय घटक)
महाराष्ट्र शासन


MB24_01 - New under construction tenement
START


म्हाडा
MHADA
सोडत म्हाडाची स्वप्नपूर्ती हक्काच्या घराची
मंगळवार, दि. ८ ऑक्टोबर २०२४


मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
(म्हाडाचा विभागीय घटक)
Lottery 2024



View Result
MB24_02 - Tenements Under DCPR 33_5,7, 58
Scheme: 495 - SWANAND CHSL, BUILDING NO. 33, NEHRU NAGAR, KURLA
1240017658
GURUPRASAD SURESH JADHAV
Tenement: 33, -, 6, 603
Priority: 1
Category: JR - Journalist
8 Oct 2024, 11:29 AM
MB24_03 - MHADA Scattered Tenements
15 Schemes - 333 Tenements - 47247 Applications
Draw Pending
View Details
Draw Lottery
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
(म्हाडाचा विभागीय घटक)
म्हाडा
MHADA